महामंडलेश्वर

**स्वामी परमानंदगिरीजी महाराजांचे**

**सत्संग - प्रवचन**

# असाध्य ते साध्य



***(प्रथम आवृत्ती)***

- प्रकाशक -

ॐ परमानंद प्रकाशन

**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज आश्रम**

भांगसीमाता गड, परमानंदनगर, शरणापूर, औरंगाबाद (महाराष्ट्र)

दूरध्वनी :

किंमत : पाच रुपये (५/-)

**निवेदन**

महान ज्ञानी, संत स्वानुभवाने सांगतात की, '' केल्याने होत आहे आधी केलेच पाहिजे '' कार्य करा कार्य केल्याने त्या कार्याची सिद्धी प्राप्त झाल्याशिवाय राहत नाही. म्हणजेच ते कार्य सिद्धीला जाते म्हणजेच पूर्णत्वाला गेल्याशिवाय राहत नाही. म्हणजेच ते कार्य पूर्ण झाल्याशिवाय राहत नाही.

महापुरुष असेही सांगतात की, **नर करणी करे तो नारायण बने । नारी करणी करे तो लक्ष्मी बने.** पुरुषाने चांगले कार्य केले तर तो नराचा नारायण बनू शकतो. नारीने म्हणजेच स्त्रीने जर चांगले कार्य केले तर ती लक्ष्मी बनू शकते, देवी बनू शकते.

सांगण्याचे तात्पर्य हेच की, या जगात असाध्य असे काहीच नाही. सर्व काही साध्य होते. **श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज** आपल्या स्वानुभवाने हे सर्व जानतात. त्यांनी असाध्य ते साध्य करिता सायास या वचनाची अनुभूती अनेक वेळेस घेतलेली आहे. ती अनुभूती आपणास देखील घेता यावी या सद्हेतूने त्यांच्या अनुभूतीपूर्ण वाणीतून निघालेले संग्रहीत केलेले **'' असाध्य ते साध्य ''** हे प्रवचन रुपी पुस्तक आपल्या हातात देतांना आनंद होत आहे.

**प्रकाशक**

**ओले मूळ भेदी खडकाचे अंग । अभ्यासासी सांग कार्यसिद्धी ।।१।।**
**नव्हे ऐसे काही नाही अवघड । नाही कईवाड तोच वरी ।।२।।**
**दोरे चिरा कापे पाडीला काचनी । अभ्यासे सेवनी विष पडे ।।३।।**
**तुका म्हणे कैसा बसण्यासी ठाव । जठरी बाळा वाव एकाएकी ।।४।।**

◆ ◆ ◆ ◆ ◆

या अभंगामध्ये तुकाराम महाराजांनी एक अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत सांगितला. महत्त्वाचा सिद्धांत म्हणण्याचे कारण हे आहे की, हा सिद्धांत सर्वांसाठी सांगितलेला आहे. सर्वासाठी म्हणजेच लहानांपासून तर वृद्धापर्यंत जेवढे असतील त्या सर्वांनाच हा सिद्धांत सांगितलेला आहे.

तसा संताचा उपदेश सर्वांसाठीच असतो. परंतु काही लोकांची अशी भ्रांती असते की संतांचा उपदेश फक्त भाविक-भक्तासाठीच किंवा मोठ्यांसाठीच असतो. परंतु वस्तूतः तसे नाही. संत सर्वांनाच आपले मानतात. जसे की,

**हे विश्वची माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर ।**
**किंबहूना चराचरी । आपनची जहाला ।।**

हे सर्व विश्व माझे आहे. अशी संतांची व्यापक भावना असते. म्हणून संतांचे कार्य जसे सर्वांच्या उद्धारासाठी कल्यांणासाठी असते. त्याच प्रमाणे संतांचा उपदेशदेखील सर्व विश्वासाठी असतो.

म्हणून या अभंगामध्ये जो सिद्धांत सांगितलेला आहे तो देखील सर्वांना समजावा असा तुकाराम महाराजांचा व्यापक दृष्टीकोन आहे. सर्वांना म्हणजेच लहान मुल, मुली, तरुण, वृद्ध, स्त्री, पुरुष, ज्ञानी, अज्ञानी, सुशिक्षीत, अशिक्षीत, शाळेत जाणारे विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी, नोकर, कामगार अशा सर्वांना हा सिद्धांत समजलाच पाहिजे. असा हा महत्त्वाचा सिद्धांत आहे.



या अभंगामध्ये सिद्धांत सांगण्यापूर्वी एक उदाहरण दिले. त्यानंतर सिद्धांत सांगितला.त्यानंतर एकच नव्हे तर परत अनेक उदाहरणे दिले.

खरे म्हणजे जे ज्ञानी असतात, ते सिद्धांत सांगतात. त्याचप्रमाणे जे ज्ञानी असतात ते देखील सिद्धांत ऐकण्याची इच्छा करतात. परंतु जे अज्ञानी असतात ते सिद्धांत न सांगता एखादी गोष्ट म्हणजेच कथा आदि सांगतात व अज्ञानी देखील कथा आदि श्रवण करून आमचे मनोरंजन व्हावे हीच इच्छा बाळगतात. जे मध्यम ज्ञानी असेल तर अशा मध्यम ज्ञान्यांना एखादा सिद्धांत सांगितला जातो व सिद्धांत कळावा यासाठी एखादे उदाहरण दिले जाते.

तुकाराम महाराज केवळ ज्ञानीच नव्हे तर परमज्ञानी होते. असे असतांना देखील त्यांनी अगोदर सिद्धांत न सांगता उदाहरण दिले व नंतर देखील अनेक उदाहरणे दिले. याचा उद्देश हाच आहे की, हा सिद्धांत अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे व तो सर्वांना समजावा अशी इच्छा असल्यामुळे सिद्धांत सांगण्यापूर्वी त्यांनी पहिले उदाहरण दिले. उदाहरण देऊन नंतर जो अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत आहे, तो सिद्धांत सांगितला. सिद्धांत कोणता? तर तुकाराम महाराज सांगतात.

**अभ्यासासी सांग कार्य सिद्धी ।**

किंवा

**नव्हे ऐसे काही नाही अवघड । नाही कईवाड तोच वरी ।।**

अभ्यास केल्यानंतर म्हणजे एखादा प्रयास वारंवार केल्यानंतर या जगात असे कोणतेच कार्य नाही की, जे सिद्धीला जात नाही म्हणजेच पूर्ण होत नाही. कोणतेही कार्य आरंभल्यानंतर ते पूर्ण होतेच. अवघड या जगामध्ये काहीच नाही. परंतु त्यासाठी निग्रह पाहिजे. वारंवार प्रयास केला पाहिजे. जोपर्यंत आपन वारंवार

प्रयास करत नाही. तोपर्यंत कोणतेही कार्य अवघड वाटते. परंतु नेहमीच्या प्रयासामुळे ते अगदी सोपे सहज होऊन जाते.

बरेचसे व्यक्ती नेहमी विचारतात की, आमचे कोणतेच कार्य होत नाही. असे का? किंवा काही असेही विचारतात की, आमचे कार्य केव्हा होईल? या सर्वांसाठी उत्तर एकच आहे की, कार्य होत नाही असे या जगात कोणतेही कार्य नाही. सर्व कार्य होऊ शकतात. परंतु त्यासाठी वारंवार प्रयास केला पाहिजे. बरेचसे व्यक्ती एखाद्या वेळेस एखाद्या कार्यासाठी प्रयास करतात. नाही जमले तर लगेच दुसरे, तिसरे चौथे असे एकानंतर एक कार्य सोडून दुसरे कार्य करत राहतात. त्यानंतर त्यांची तक्रार असते की, आमचे कोणतेच कार्य होत नाही. अशाने आपणास कधी कार्यात यश मिळू शकत नाही. जसे जमिनीमध्ये थोडे थोडे एका नंतर एक गड्डे करत गेल्यानंतर पाणि मिळू शकत नाही. पाणी मिळण्यासाठी एकाच ठिकाणी खोदत राहिले पाहिजे. जेणेकरून त्या ठिकाणी विहीर तयार होते. त्या विहिरीला पाणी लागून ते पाणी पिऊन तो तृप्त होतो. थोडे थोडे गड्डे करून त्याला पाणी मिळून तो तृप्त होऊ शकत नाही.

म्हणून आपले कार्य सिद्धीस जावे पूर्ण व्हावे असे वाटत असेल तर, त्या साठी रात्रंदिवस प्रयास केला पाहिजे. हे समजण्यासाठी '' अभ्यासासी सांग कार्य सिद्धी '' किंवा '' नव्हे ऐसे काही नाही अवघड नाही कईवाड तोच वरी '' हे समजण्यासाठी पहिले उदाहरण दिले की,

**ओले मूळ भेदी खडकाचे अंग ।**

जसे शेतात, जगंलात, अरण्यात जे राहतात. त्यानांच नव्हे तर इतरांनाही माहीत असेल की, झाडाचे ओले मूळ अत्यंत मुलायम असते. पाणी आणि मातीच्या कनापासून ते बनलेल असत. तरी परंतु रात्रंदिवस प्रयास करत असल्यामुळे कठीण अशा खडकाचे अंग ते भेदून टाकत



बऱ्याचशा ठिकाणी आपण बघितले असेल की, खडकामध्ये पिंपळ किंवा वडाच्या मुळया शिरतात व त्या ठिकाणी त्या खडकामध्ये पिंपळाचे झाड वाढते. रात्रंदिवस प्रयास केल्यामुळे त्या ओल्या मुलायम वृक्षाच्या मुळया खडकाचे अंग भेदून टाकतात. असे ऐकल्यानंतर कदाचीत काही म्हणतील की, मुळया जमिनीत वाढत असतात. त्या तर आम्हास दिसत नाही की, त्या रात्रंदिवस कार्य करतात किंवा नाही. आणि आम्ही समजा एखादे कार्य रात्रंदिवस चालूच ठेवू शकलो नाही तर आम्हास त्या कार्यात यश येणार नाही का? तर त्यासाठी परत दुसरे उदाहरण दिले की,

**''दोरे चिरा कापे पाडिला काचनी''**

बऱ्याचशा गावामध्ये विहीर किंवा आड असतो. त्या विहिरीला किंवा आडाला कठीण अशा प्रकारचा दगडाचा चिरा लावलेला असतो. बरेचसे स्त्री-पुरुष त्या आडातून किंवा विहिरीतून झाडाच्या सालीपासून बनविलेल्या दोराने पाणी ओढतात. त्यामुळे तो दोर कठीण अशा दगडाच्या चिऱ्याला घासतो व त्यामुळे त्या दगडाच्या कठीण चिऱ्याला काचनी पडते. म्हणजेच जे कार्य कठीण वाटते ते देखील नेहमी नेहमी केल्यामुळे सहज होऊन जाते. मूळ सिद्धांत सर्वांनाच समजावा. अगदी जो व्यसनी असेल त्याला देखील हा सिद्धांत कळावा. या साठी व्यसनी लोकासाठी उदाहरण दिले की

**अभ्यासी सेवनी विष पडे ।**

म्हणजे विष प्राशन केल्यानंतर लगेच व्यक्ती मरतो. परंतु थोडे थोडे विष प्राशन केले तर ते नंतर पचनी पडायला लागते. म्हणजे लगेच तो मरत नाही. व्यसनी लोकांना समजण्यासाठी जसे उदाहरण दिले त्याचप्रमाणे ज्या स्त्रिया असतील त्यांना देखील हा सिद्धांत समजावा या साठी तुकाराम महाराज म्हणतात की...

**तुका म्हणे कैसा बसण्यासी ठाव । जठरी बाळा वाव एकाएकी ।।**

आईच्या जठरामध्ये म्हणजेच आईच्या गर्भामध्ये बाळ वाढत असते. जसजसी बाळाची वाढ होते, त्या प्रमाणे त्या आईच्या गर्भात बसण्यासाठी राहण्यासाठी बाळाला जागा होते. त्याच प्रमाणे आईला देखील आपल्या गर्भात बाळाला धारण करण्याची क्षमता प्राप्त होते.

अभ्यास केल्यानंतर कार्य सिद्ध होते. कार्यामध्ये कार्य करणाऱ्याला यश मिळते. असे केवळ तूकाराम महाराजच म्हणतात असे नाही तर अनेक खऱ्या साधकांचा भक्तांचा साधूसंतांचा देखील अनुभव आहे. जसे ज्ञानेश्वर महाराज देखील म्हणतात...

**अगा अभ्यासयोगू म्हणिजे । तो हा एकू जानिजे ।**
**येणे काही न निपजे । ऐसे नाही ।।**

या जगामध्ये अनेक योग आहेत. जसे कर्मयोग, भक्तीयोग, ज्ञानयोग, आष्टांगयोग तर प्रसिद्ध आहेच. त्याच प्रमाणे अजून एक योग आहे, तो म्हणजे अभ्यासयोग. या अभ्यास योगामुळे या जगात असे काहीच नाही, जे होत नाही. अभ्यास योगामुळे सर्व काही होते. या अभ्यास योगामुळे काय होते, याचे काही उदाहरणे देतांना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

**पै अभ्यासाचेनी बळे । एकी गती अंतराळे ।**
**वाघ्र सर्प प्राजंळे । केले एकी ।।**

एवढेच नव्हे तर

**विष की आहारी पडे । समुद्री पायवाट जोडे ।**
**एकी वाग्ब्रह्म थोकडे । अभ्यासे केले ।।**

'' पै अभ्यासाचेनी बळे एकी गती अंतराळे '' अभ्यासामुळे काही अभ्यासयोगी म्हणजेच वारंवार अभ्यास करणारे योगी अंतराळामध्ये गमण करतात. म्हणजेच पक्षाप्रमाणे आकाशामध्ये भ्रमण करतात.



आता काही म्हणतील की असे आकाशामध्ये उडणारे योगी तर आम्ही बघितले नाही. त्यासाठी परत दुसरे उदाहरण देतात **''व्याघ्रसर्प प्राजंळे केले एकी ''** जसे काही व्यक्ती कुत्रे पाळतात त्याप्रमाणे काही वाघ पाळतात. किंवा सर्पाच्या सानिध्यात राहतात.

काही अभ्यासयोगी तर जसे आपण जमिनीवर चालतो. जमिनीवर टेकडी असेल किंवा खोल दरी असेल तरी पायवाटेने चालत राहतो. त्याचप्रमाणे काही अभ्यासयोगी '' समुद्री पायवाट जोडे '' पायवाटेने जमिनीवर चालावे त्या प्रमाणे समुद्रावर चालतात. काही पाण्यावरती बसतात. हे सर्व करण्यासाठी काही भगवंताची विशेष शक्ती प्राप्त झालेली आहे असे नव्हे तर हा सर्व अभ्यासाचा परिणाम आहे.

अशा प्रकारे अभ्यासाने सर्व काही शक्य होते. हे सांगण्यासाठीच अनेक उदाहरणे दिले जसे अभ्यास योगामुळे काही अभ्यास योगी आकाशामध्ये गमण करतात. काही समुद्रावरती चालतात. काही वाघ साप पाळतात. हे सर्व आपण नसेल बघितले तर त्यासाठी अजून एक परिचयाचे उदाहरण दिले. ज्याचा बऱ्याच व्यक्तिने अनुभव देखील घेतला असेल ते उदाहरण म्हणजे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात... **'' विष की आहारी पडे ''** किंवा तुकाराम महाराज म्हणतात **''अभ्यासे सेवेनी विष पडे ''**

वारंवार अभ्यास केल्यामुळे विषदेखील पचनी पडायला लागते. ज्यांनी व्यसन केले असेल त्यांना प्रत्येकालाच थोड बहूत अनुभव आल्याशिवाय राहत नाही. जसे जे व्यक्ती सुरुवातीला तंबाखू खाण्याचा अभ्यास करतात तर बऱ्याच व्यक्तीना अनुभव येतो की, केवळ तंबाखूचा स्पर्श जिभेला करताच बऱ्याच व्यक्तिंना चक्कर येतात. ढाळ म्हणजेच जुलाब झाल्यानंतर जशी परिस्थिती होते त्या

प्रमाणे परिस्थिती होते. वांत्या होतात. परंतु सराव झाल्यानंतर हे सर्व काही होत नाही. त्यामुळे बरेच तंबाखूचे व्यसनी व्यक्ती बाजारातील शेव आदि खाऊ खावा त्या प्रमाणे ते तंबाखू खात असतात व म्हणतात की, तंबाखू खाल्याने काही होत नाही. याचा अर्थ हा की आता चक्कर येत नाही, वांती होत नाही एवढेच. परंतु तंबाखूचा परिणाम शरिरावर झाल्याशिवाय राहत नाही. काही तंबाखूचे व्यसन करनारे व्यसनी तंबाखू ओठाच्या आत कोबूंन ठेवतात. काही दिवसांनी त्या ठिकाणी व्रण तयार होतात. अति प्रमाणामुळे ओठाला छिद्र पडत. तसेच जठराला छिद्र पडते व त्यातून तंबाखूचे पाणीच काय खालेल्ले अन्न पाणी सर्व शरीराच्या बाहेर निघून जात. कॅन्सरसारखी महाभयानक व्याधी म्हणजेच रोग जडतो. त्यामुळे मृत्यूशिवाय काहीही पर्याय राहत नाही. तंबाखूच्या सेवनामुळे कॅन्सरसारखे रोग होतात असे शास्त्रज्ञ किंवा डॉक्टर सांगातात. तेव्हा काही व्यक्ती असे म्हणतात की, आम्ही तर आयुष्यात कधी तंबाखूचे सेवन केले नाही. आम्हाला तर कॅन्सर झाला. मग कसे मानायचे की, तंबाखूच्या सेवनाने कॅन्सर होतो? याचे उत्तर हेच आहे की, आपण भलेही तंबाखूचे सेवन केले नसेल परंतु आपल्या आई-वडीलांनी किंवा अजोबा आजींनी किंवा पणजोबांनी जरी व्यसन केले असेल तर अनुवंशिक धर्माप्रमाणे त्याचा परिणाम आपल्या शरीरावरती होऊ शकतो. म्हणून तंबाखू, विडी, सिगारेट, चरस, गांजा, गुटखा, मद्य इत्यादिंच्या सेवनाने काही होत नाही असे म्हणणे एकदम चुकीचे आहे. या व्यसनांचा परिणाम केवळ आपल्या शरीरावरच होतो असे नव्हे तर, आपल्या भावी पिढीवर देखील व्यसनांचा परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून असे जे महाभयानक दुष्परीनाम करणारे व्यसनी पदार्थ असतात, ज्यांच्यामध्ये वीष ही वीष असते, ते सेवन करने सुरूवातीला एकदम अशक्य वाटते. जसे तुकाराम महाराज म्हणतात.



**साधूनी बचनाग खाती तोळा तोळा । आणि का ते डोळा न पाहवे ।।**

साधूंनी म्हणजे साधना करून वारंवार अभ्यास करून काही व्यसनी लोक तोळा तोळा बचनाग खातात इतरांना त्याचे बचनाग खाने देखील पहावल्या जात नाही. एवढे ते भयंकर वाटते. असे ऐकून आपण देखील बचनाम खाऊ नये. व्यसने करू नये. हा उपदेश  न घेता चांगला अर्थ समजून न घेता वचनाच्या अर्थाचा अनर्थ करतात. जसे बरेचसे व्यसनी साधूंनी बचनाम या वचनाचा योग्य अर्थ समजून न घेता अर्थाचा अनर्थ करतात. ते म्हणतात की, साधूंनी म्हणजे 'साधू' खातात तर मग आम्हाला खाण्यासाठी काय हरकत आहे. अशा प्रकारे ते वचनाचा विपरीत अर्थ लावतात. साधू संतच खातात तर मग आम्हाला काय हरकत आहे. असे म्हणून ते व्यसने करतात. बरेचसे अज्ञानी, व्यसनी लोक तर साधू संतांनाच काय देवांचा देव महादेव भगवान शंकराला देखील दोष लावतात. ते म्हणतात की भगवान शंकर भांग पितात. भगवान शंकराला भांग पिण्याचे व्यसन आहे. तेव्हा आम्ही भांग पिण्याचे व्यसन केले तर काय हरकत आहे? अशा प्रकारे आपले दोष लपविण्यासाठी दुसऱ्यांनाच काय परंतु साधूसंतांना एवढेच नव्हे तर आत्ताच सांगितले की देवाचे देव महादेवाला देखील दोष लावतात.

भगवान शंकराला कोणतेही वाईट व्यसन नाही. भगवान शंकराला एक व्यसन जरूर आहे. रात्रंदिवस भगवान शंकर त्या व्यसनामध्ये तल्लीन असतात. ते व्यसन म्हणजे भव, भय, भंग व्यसनम्.

भव म्हणजे संसार, भय म्हणजे संसाराचे भय जन्ममृत्यूचे भय, काळाचे भय भंग म्हणजे नाश करणे. म्हणजेच भगवान शंकराच्या भक्ताला जे भवाचे म्हणजेच संसाराचे भय असते ते भगवान शंकर

भंग करतात. म्हणजेच नाश करतात. म्हणजेच संसाराच्या भयापासून भक्ताला मुक्त करण्याचे भगवान शंकराला व्यसन आहे, म्हणून आपन भगवान शंकराची भक्ती केली पाहिजे. की जेने करून भगवना शंकर आपल्याला भव भयापासून मुक्त करतील. असा बोध तर व्यसनी लोक घेत नाही. उलट भगवान शंकराला व्यसन आहे, तर मी व्यसन केले तर काय हरकत आहे. असे कुविचार करून व्यसन करतात. व अधोगतीला जातात.

बऱ्याच व्यसनी व्यक्तीना जर साधू संतानी सांगितले की व्यसने करणे चांगले नाही तर काही अविवेकी असे ही विचारतात की, व्यसने करणे चांगले नाही तर मग भगवंताने व्यसनाचे पदार्थ बनविले कशासाठी? याचे उत्तर हेच देता येईल की, भगवंताच्या सृष्टीत चांगले वाईट जसे आहे, त्याचप्रमाणे चांगले वाईट जाणण्याची विवेक बुद्धी देखील भगवंताने आपणास दिलेली आहे. त्या विवेक बुद्धीचा वापर न करता भगवंतास दोष देणे चांगले नाही. जसा भगवंताने अग्नी निर्माण केला. म्हणून अग्नीने कपडे व घर जाळून न घेता स्वयंपाक तयार करून जेऊन तृप्त झाले पाहिजे. त्याचप्रमाणे भगवंताच्या सृष्टित जसे व्यसनाचे पदार्थ म्हणजेच दोष आहे त्यापासून सावधान राहिले पाहिजे. म्हणून साधूनी म्हणजे साधना करून असा अर्थ घेतला पाहिजे. जसे तुकाराम महाराज अजून एक उदाहरण देतात...

**साधूंनी भुजंग धरतील हाती । आणिके कापती देखोनिया ।।**

साधूंनी म्हणजेच साधना करून काही व्यक्ती भुजंग म्हणजेच नाग, सर्प धरतात. तिकडे ते नाग किंवा सर्प धरतात व इकडे लांबून बघनारे थर थर कापत असतात. एक निर्भयपणे नाग किंवा सर्प धरतो व दुसरा भयभित होतो. याचे कारण काय तर अभ्यास. म्हणनू साधूंनी भुजंग धरतील हाती याचा अर्थ हा नव्हे की, साधू संत साप धरतात



किंवा साप धरला म्हणजे साधू होतो असे ही नाही परंतु काही एखाद्या वचनाचा चुकीचा अर्थ लावतात. त्यामुळे आपणही आचारभ्रष्ट होतात व इतरांनाही आचार भ्रष्ट करतात. काही असे समजतात की, साधू गांजा पितात, भांग खातात किंवा विडी, सिगारेट, चिलीम ओढतात. अशी चुकीची समजूत काही करून घेतात. त्यामुळे तुकाराम महाराज म्हणतात की,

**ऐसे संत झाले कळी । तोंडी तंबाखुची नळी ।।**

कलीयुगामध्ये असेही काही स्वतःला संत म्हणवतात की, ज्यांच्या तोंडामध्ये नेहमी विडी, सिगारेटची नळी असते. असे जे व्यसने करतात ते संत नसतात. कारण संतांना भगवंताच्या नाम जपाव्यतिरिक्त, भगवंताचे स्मरण, चिंतन करण्याव्यतिरीक्त, सर्व जन हिताय सर्व जन सुखाय कार्य करण्याव्यतिरीक्त, कोणतेही व्यसन नसते. म्हणून संत विडी, सिगारेट, भागंच काय परंतु खरे संत चहा देखील पीत नाही. आपण देखील चहाचे व्यसन करू नये. कारण चहामध्ये देखील अनेक विषारी द्रव्ये असतात. त्यामुळे चहा पिणे चांगले नाही. चहा ऐवजी गावरान गाईचे दुध प्याले पाहिजे. गावरान गाईचे दूध प्याले पाहिजे असे सांगितल्यानंतर काही विचारतात की, म्हशीचे दुध प्याले तर चांगले नाही का? ठीक आहे. परंतु म्हशीच्या दुधाने बुद्धी म्हशीसारखीच होते. म्हशीच्या व गायीच्या बुद्धीत जसे अंतर आहे. तसेच अंतर ते दुध सेवन करणाऱ्यामध्ये येते असा अनेकांचा अनुभव आहे. त्यामुळे गाईच्या दूध सेवनाने बुद्धी प्राप्त होते. गायीपासून जन्माला येतो नंदी. जो नंदी धर्माचे प्रतिक मानलेला आहे व भगवान शंकराचे तो वाहन आहे. म्हशीपासून जन्माला येतो हेला किंवा रेडा. जो यमाचे वाहन आहे. आपल्या घरी नंदीवर आरुढ होऊन भगवान शंकर यावे की, यमराज यावे हे

आपले आपणच ठरवावे.

गायीचे दूध आणि आईचे दूध समान असते असे अनेकांचे मत आहे. त्यामुळे एखाद्याची आई मृत्यू पावल्यास त्याचे पोषन गायीच्या दुधाने चांगले होऊ शकते. हे सर्व सांगण्याचे तात्पर्य हेच आहे की, गायीचे दूध प्राशन करणे गंगाजल प्राशन करणे चांगले आहे. परंतु चुकून देखील व्यसनाचे पदार्थ सेवन करणे चांगले नाही.

आतापर्यंत जे अनेक उदाहरणे दिले की, जसे अभ्यासामुळे काही अभ्यासयोगी आकाशात गमन करतात. काही समुद्रावरती चालतात. हे सर्व सांगण्याचा उद्देश हाच आहे की जो तुकाराम महाराजांनी सांगितला. तुकाराम महाराज म्हणतात...

**असाध्य ते साध्य करिता सायास । कारन अभ्यास तुका म्हणे ।।**

अभ्यास केल्यानंतर या जगामध्ये असाध्य काहीच नाही. सर्व काही साध्य आहे. परंतु त्यासाठी अभ्यास केला पाहिजे. जे रात्रंदिवस अभ्यास करतात त्यांना काही दिवसानंतर किंवा काहींना काही महिण्यानंतर तर काहींना काही वर्षानंतर किंवा काहींना काही जन्मानंतर जे प्राप्त करावयाचे आहे, जे साध्य करायचे आहे ते साध्य झाल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे सतत अभ्यास करीत राहिले पाहिजे.

आतापर्यंत जे उदाहरणे आदी देऊन सांगितले की, असाध्य गोष्ट अभ्यासाने साध्य होते. याचा थोडा बहूत आपणास देखील आपल्या जीवनात अनुभव आला असेलच. जसे या ठिकाणी देखील जे अनुष्ठानाला बसतात तर सुरूवातीला सकाळी उठने, थंड पाण्याने स्नान करने. एकाच आसनावर जास्त काळ बसने अवघड वाटते. परंतु नंतर सवईमुळे अभ्यासामुळे हे सर्व करणे अगदी सहज वाटते.

हा सर्व बोध व उदाहरणे ऐकल्यानंतर एक सिद्धांत निश्चीत मनामध्ये स्थिर केला पाहिजे. तो म्हणजे या जगामध्ये असाध्य काहीच



नाही. सर्व काही साध्य होते. सर्व काही साध्य करता येते. म्हणून आपण काय साध्य केले पाहिजे याचा देखील निश्चीत विवेक विचार केला पाहिजे. जसे सांगितले की काही अभ्यास योगी अभ्यासामुळे आकाशात गमन करतात. काही समुद्रावरती म्हणजेच पाण्यावरती चालतात. म्हणून आपन आकाशात उडण्याचा किंवा पाण्यावरती चालण्याचा अभ्यास करा असे नाही. मानवाचा देह प्राप्त झाल्यानंतर हे शिकण्याचा अभ्यास करत असेल तर त्या पेक्षा तर पाणकोंबडी चांगली. कारण ती आकाशात उडते, पाण्यावरती तरंगते व बऱ्याच वेळपर्यंत पाण्यात बुडून राहते. म्हणून हा अभ्यास किंवा व्यसने करण्याचा अभ्यास न करता, तो अभ्यास केला पाहिजे की, ज्या अभ्यासामुळे मानव जीवन कृतार्थ होते.

म्हणून व्यसने आदि करून मरण्याचा अभ्यास करण्यापेक्षा आपण तरून जगाला तारण्याचा अभ्यास केला पाहिजे. आतापर्यंत जो उपदेश केला किंवा उदाहरने दिले त्या सर्वाचा उद्देश एकच आहे. तो म्हणजे जसे ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरी मध्ये म्हणतात किंवा भगवंत अर्जुनाला निमित्त करून सांगतात.

**म्हणोनी अभ्यासासी काही । सर्वथा दुष्कर नाही ।**
**यालागी माझ्या ठायी । अभ्यासे मिळ ।।**

अभ्यास केल्यानंतर अशक्य असे या जगात काहीच नाही. म्हणून कोणता अभ्यास केला पाहिजे तर भगवंताला जाणून भगवंत होण्याचा भगवंतामध्ये मिळून भगवंत स्वरुप होण्याचा अभ्यास केला पाहिजे. जसे साधू संतानी अनुभूती घेतली की, ''देव पाहावयासी गेलो ।तेथे देवची होऊनी ठेलो.'' किंवा '' पाहावयासी गेलो देव । तेथे मी स्वयमेव.'' म्हणून आपण देखील भगवंतामध्ये मिळून भगवंताला जानून भगवंत स्वरुप झाले पाहिजे.

भगवंत स्वरुप व्हायचे कसे? त्यासाठी काय केले पाहिजे. तर त्या साठी उदाहरण दिले.

**मग पुनवेहूनी जैसे । शशिबींब दिसेंदिसे ।**
**हरपत अवसे । नाहीची होय ।।**
**तैसे भोगातूनी निघता । चित्त मजमाजी रिघता ।**
**हळू हळू पंडूसूता । मि ची होईल ।।**

पौर्णिमेच्या रात्री आकाशात शशीबिंब म्हणजे चंद्रमा पूर्ण विराजमान असतो. त्यानंतर घटत घटत अवसे म्हणजेच अमावास्येला काहीच दिसत नाही. त्याचप्रमाणे आपली चित्तवृत्ती भोगातून संसारप्रपंचामधून काढून भगवंताकडे लावली पाहिजे. त्यामुळे काय होते तर सांगतात की, चित्त वृत्ती भगवंताकडे लागल्यानंतर वृत्ती भगवंत स्वरुप होते.

तात्पर्य की अभ्यासामुळे सर्व काही शक्य होते. म्हणून भगवंताच्या चिंतनाचा स्मरणाचा अभ्यास करून भगवंत स्वरुप झाले पाहिजे. रात्रंदिवस भगवंताचे स्मरण, चिंतन केले पाहिजे. रात्रंदिवस भगवंताचे स्मरण, चिंतन करावयाचे असेल तर त्यासाठी ब्रह्ममुहूर्तापासून सुरूवात केली पाहिजे. म्हणून अनेक साधूसंत, ऋषीमुनी, शिष्य भक्त ब्रह्ममुहूर्तात उठतात आणि काय करतात? तर स्नान, संध्या, जप, नित्य अनुष्ठान करतात. भगवंताची पूजापाठ करतात. ध्यान करतात. आणि आरती करतात.



## स्वामीजींचे जपानुष्ठान काळातील सत्संग - प्रवचन

# पुस्तके, व्ही.सी.डी

| दिवस | सकाळ | रात्री |
|---|---|---|
| १ ला | जन्म - मृत्यू चक्र निवृत्ती | मायाजाळापासून मुक्ती |
| २ रा | प्रातःकाळी उठावे | संसार सागरातून मुक्ती |
| ३ रा | नाम जपाची विधी | करावे तसे भरावे |
| ४ था | ध्यानाची विधी | नाम जपाने मुक्ती |
| ५ वा | भोजनाने भक्ती | संत संगतीने मुक्ती |
| ६ वा | असाध्य ते साध्य | दानाने सद्‌गती |
| ७ वा | पाप निवृत्ती उपाय | सद्‌गुरु वचनमृताने मुक्ती |
| ८ वा समाप्तीचा दिवस | प्रवृत्ती निवृत्ती मार्ग | नित्यकर्म - अनुष्ठान महिमा |